फौ. कि. चौ. अर्ज क्र.१३४/२०२२

गिता+०२ वि. तानाजी +०२

CNR No. MHRG090006282022

## अर्ज नि.क्र.०५ खाली आदेश

०१. अर्जदार क्र.०१ हिने प्रस्तूतचा अर्ज कौटूंबीक हिंसाचारापासून महिलांचे संरक्षण करण्याबाबत अधिनियम, २००५ ('कौटूंबिक हिंसाचा अधिनियम' संक्षीप्त स्वरूपात) कलम २३ अन्वये उत्तरवादी क्र.०१ ते ०३ यांचेकडून तिचेवर कौटूंबिक हिंसाचारास प्रतिबंध व्हावा व उत्तरवादी क्रमांक ०१ याने ती व इतर अर्जदार राहात असलेल्या घराची विक्री करू नये व त्यामध्ये भाडेकरू ठेऊ नये या मागण्या पूर्ण करण्याची विनंती केली.

०२. अर्जदार क्र.०१ हिने दाखल केलेला सदरील अर्ज व उत्तरवादी क्र.०१ ते ०३ यांनी सदर अर्जावर त्यांचे दिलेले म्हणणे (नि.क्र.१५) वाचले. अर्जदार व उत्तरवादी क्र.०१ ते ०३ यांचे विद्वान विधीज्ञांचा युक्तिवाद ऐकला. अभिलेखाचे अवलोकन केले.

०३. अर्जदार व उत्तरवादी यांचे कथनाकडे वळण्यापूर्वी कौटूंबिक हिंसाचार अधिनियम मधील कलम २३ चे अवलोकन करणे न्यायोचीत ठरेल. सदरील कलमाचे काळजीपूर्वक अवलोकन केले असता उत्तरवादी याने कौटूंबिक हिंसाचाराचे कृत्य केले आहे किंवा ते तो कृत्य करीत आहे किंवा सदरील स्वरूपाचे कृत्य घडणे त्याचेकडून संभाव्य आहे अशी न्यायालयाची अर्जदाराने केलेल्या अर्जावरून सकृतदर्शनी खात्री झाली असता न्यायालय कौटूंबिक हिंसाचार अधिनियम खाली नमूद कलम १८ ते २२ मधील मागण्यांचे अनुशंगाने अंतरीम किंवा एकतर्फी आदेश पारीत करू शकत असल्याचे स्पष्ट होते.

०४. अर्जदार क्र.०१ हिने प्रस्तूतचा अर्ज शपथेवर दाखल केला. अर्जातील कथन उत्तरवादी यांनी अर्जदार क्र.०१ हिला शारिरीक व मानसिक प्रकारचा त्रास देवून तिचेवर कौटूंबिक हिंसाचार केल्याचे दर्शवितो. अर्जदार क्र.०१ हिचे कथन उत्तरवादी क्र.०१ ते ०३

तिचे चारित्र्यावर संशय घेतात, त्याच अनुशंगाने त्यांनी तिचेवर देखरेख ठेवून तिला अपमानीत केले, उत्तरवादी क्र.०२ व ०३ हे उत्तरवादी क्र.०१ यास अर्जदार राहात असलेली सदनिका विक्री करण्याकरीता भडकावितात,उत्तरवादी हे अर्जदार क्र.०१ हिचे सोबत सदनिका विक्री करण्याचे कारणावरून वाद घालतात, ते अर्जदार राहात असलेली सदनिका विक्री करून त्यांना घराबाहेर हाकलून देण्याचे तयारीत आहेत व इतर प्रकारे तिला त्रास देतात, या संबंधी कथन केल्याचे दिसून पडते. परिणामी, तिने प्रस्तूतचे अर्जाद्वारे परि.क्र.०१ मधील नमूद मागण्या उत्तरवादी क्र.०१ ते ०३ यांना पूर्ण करण्याचे अनुशंगाने आदेश देण्याची विनंती केली.

०५. याउलट उत्तरवादी क्र.०१ ते ०३ यांचे कथन असे दर्शविते की, अर्जदार क्र.०१ ही उत्तरवादी क्र.०१ च्या मुलाची पत्नी असून अर्जदार क्र.०२ व ०३ हे त्यांचे नातू आहेत. त्यांनी अर्जदाराशी असलेले नातेसंबंध व अर्जदार क्र.०१ चे पतीचा मृत्यू झाल्याची बाब मान्य केली. परंतू, त्यांनी अर्जदार क्र.०१ हिने त्यांचेवर केलेले आरोपी नाकारले. त्यांचे कथनाप्रमाणे त्यांनी नेहमी अर्जदारांना आर्थिक मदत केली आहे. अर्जदार क्र.०१ हिने तिचे पती गंभीर आजारी असल्याचा निरोप उत्तरवादी यांनी तिला देऊन देखील त्याचे मृत्यूपर्यंत ती त्याला बघायला आली नाही. त्यांचे कथन अर्जदार राहात असलेली सदनिका उत्तरवादी क्र.०१ ची स्वकष्टार्जीत मालमत्ता असल्याची बाब दर्शविते. अर्जदार क्र.०१ हिने उत्तरवादी क्र.०१ कडे सदरील सदनिका तिचे नावावर करून देण्याची मागणी केल्यामुळे त्यांना धक्का बसला. त्याच अनुशंगाने अर्जदार क्र.०१ हिचे भावाने सदनिका न दिल्यास आठ लाख रूपये देण्याची मागणी केली. सदर सदनिका ही ते विकणार नसून ती त्यांनी त्यांचे अडीअडचणीची तजवीज म्हणून ठेवली आहे. अर्जदार क्र.०१ हिने त्यांना केवळ त्रास देण्याकरीता प्रस्तूतचा अर्ज दाखल केला. सबब, उत्तरवादी यांनी प्रस्तूत अर्ज फेटाळण्याची विनंती केली.

०६. पुढे जाण्यापूर्वी अर्जदार व उत्तरवादी यांना मान्य असलेल्या बाबी विचारात घेणे

क्रमप्राप्त ठरते. अभिलेखाची काळजीपूर्वक पहाणी केली असता अर्जदार व उत्तरवादी यांचेमध्ये नातेसंबंध दोन्ही पक्षांना मान्य असून अर्जदार क्र.०१ चे पतीचा मृत्यू झाल्याची बाब दोन्ही पक्षांना मान्य असल्याचे दिसून पडते.

०७. अर्जदार व उत्तरवादी यांनी त्यांचे कथन शपथेवर अभिलेखावर दाखल केले. नमूद परिस्थितीमध्ये कोणता पक्ष सत्य बोलत आहे?, हे ठरविणे काही अंशी कठिण आहे. उल्लेखनीय बाब म्हणजे संरक्षण अधिकारी यांनी कौटूंबिक हिंसाचार घटनांचे अनुशंगाने अहवाल दाखल केल्याचे दिसून पडते. सदरील अहवालाचे काळजीपूर्वक अवलोकन केले असता उत्तरवादी हे अर्जदार क्र.०१ हिचे चारित्र्यावर संशय घेतात, त्यांनी तिचेवर देखरेख ठेऊन तिला अपमानीत केले, ही बाब स्पष्टपणे दिसून येते.

०८. सामान्य परिस्थितीमध्ये कुठलिही भारतीय स्त्री तिचे सासरचे व्यक्तींकडून तिला चांगल्या प्रकारची वागणूक मिळत असल्यास त्यांचेविरूद्ध खोटे दोषारोप करण्याचा पर्याय निवडणार नाही. त्याचप्रमाणे कुठलिही स्त्री तिचे चारित्र्यावर संशय घेतल्यास तिला अपमानजनक वाटेल. नमूद परिस्थितीमध्ये अर्जदारांनी दाखल केलेल्या तक्रारीमध्ये तथ्य असल्याचे दिसून पडते.

०९. उत्तरवादी क्र.०१ ते ०३ यांनी अर्जदार हिचे चारित्र्यावर वैधकारणाशिवाय संशय घेणे, ही बाब कौटूंबीक हिंसाचार अधिनियमाच्या कलम ०३ मधील 'शाब्दीक आणि भावनीक दुर्व्यवहार' या संकल्पनांमध्ये मोडते.

१०. अर्जदारांचे कथनाप्रमाणे ते राहात असलेली सदनिका उत्तरवादी क्र.०१ यांचे मालकीची आहे. उल्लेखनीय बाब म्हणजे अर्जदारांचे कथन कुठेही त्यांनी किंवा अर्जदार क्र.०१ चे पतीने उत्तरवादी क्र.०१ याला सदर सदनिका विकत घेण्याकरीता कोणत्याही प्रकारची मदत केल्याचे दर्शवित नाही. पुढे उत्तरवादी यांचे कथन सदर सदनिका उत्तरवादी क्र.०१ चे स्वकष्टार्जीत असल्याचे स्पष्टपणे दर्शविते. नमूद परिस्थितीमध्ये अर्जदार क्र.०१ हिने मागणी

केल्याप्रमाणे उत्तरवादी क्र.०१ यांना सदर सदनिकेमध्ये भाडेकरू ठेवण्यापासून किंवा त्याची विक्री करण्यापासून प्रस्तूत न्यायालयाला प्रतिबंध घालता येणार नाही. त्याचप्रमाणे अर्जदार क्र.०१ हिने तशा स्वरुपाचा प्रयत्न उत्तरवादी क्र.०१ ने केल्याचे दर्शविणारा सबळ पुरावा देखील अभिलेखावर दाखल केला नाही. वरील नमुद विवेचनाअंती प्रस्तूतचा अर्ज अंशतः मंजूर करणे न्यायोचीत ठरेल. सबब, मी खालील आदेश पारीत करीत आहे.

## <u>आदेश</u>

०१. अर्जदारांचा अर्ज अंशतः मंजूर करण्यात येतो.

०२. उत्तरवादी क्र.०१ ते ०३ यांनी अर्जदार क्र.०१ हिचेवर कोणत्याही स्वरूपाचा कौटूंबीक हिंसाचार करू नये.

०३. अर्जदार क्र.०१ हिने उत्तरवादी क्र.०१ यांना ती राहात असलेली सदनिका विक्री करण्यापासून व त्यामध्ये भाडेकरू ठेवण्यापासून प्रतिबंध करण्याची केलेली मागणी नाकारण्यात येते.

०४. आदेशाची प्रत अर्जदार क्र.०१ व उत्तरवादी क्र.०१ क्र.०१ ते ०३ यांना मोफत देण्यात यावी.

०५. आदेशाची प्रत पोलीस स्टेशन, रोहा व संरक्षण अधिकारी यांना पाठविण्यात यावी. त्यांनी प्रस्तूत आदेशाचे अंमलबजावणीमध्ये अर्जदारास मदत करावी.

sunil sakharam mahale
Digitally signed by sunil sakharam mahale
Date: 2023.08.03 17:50:24 +0530

स्थळ : रोहा.
दिनांकः ०३.०८.२०२३

(एस. एस. महाले)
न्याय दंडाधिकारी प्रथम वर्ग, रोहा

# CERTIFICATE

I affirm that the contents of this PDF file order are same word to word as per the original Judgment or Order.

| | | |
|---|---|---|
| Name of the stenographer | :- | S.G.Padwal, Grade -III. |
| Name of the Court | :- | C.J.J.D. & J.M.F.C. Roha, |
| Judgment / Order dictated on | :- | 03/08/2023. |
| Judgment / Order delivered on | :- | 03/08/2023. |
| Judgment / Order signed on | :- | 03/08/2023. |
| Judgment / Order uploaded on | :- | 03/08/2023. |